सौंदर्यलहरी - १०१

प्रदीपज्वालाभिर्दिवसकरनीराजनविधिः
सुधासूतेश्चन्द्रोपलजललवैरर्घ्यरचना।
स्वकीयैरम्भोभिः सलिलनिधिसौहित्यकरणं
त्वदीयाभिर्वाग्भिस्तव जननि वाचां स्तुतिरियम्॥

सर्वेश्वर मानस पूजा -

सर्व चराचर भरुनी उरला
त्या तुजला प्रेमळा।
कसे आवाहन करु मंगळा ॥१॥

तुजविण कोठे थार जगाला
सर्वत्री व्यापला
आसना काय देऊ का तुला ॥२॥

चरणापासुनी तुझ्याच वाहे
गंगानदी पावनी
पाद प्रक्षालन करु कोठुनी ॥३॥

धवलपूर्ण स्फटिकासम कांती
शोभे तव निर्मळा
अर्घ्य आंघोळ काय धुई मळा ॥४॥

निर्लेप तुला उटी लेप कशाचा करु
तू स्वयें तापहर शीतल जल का धरु
तू शांत कशाला चंदन उगाळुनी झरु
अनंत गगनाच्या प्रांगणी
तुजसी झाकावया ॥५॥

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | APRIL '14 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | |
| 27 | 28 | 29 | 30 | | | | |
| S | M | T | W | T | F | S | |

© www.madhaveeraghuveer.com

कोठुनी वसे आणू का प्रिय
स्नानाचा तू सागर
असती, जीवनातु जाणिवा
स्नाने काय घालू माधवा ॥६॥

माणिकमोती नील रत्न नगा
तुजसी का खुलविती
ज्याची कांति तू श्रीपती ॥७॥

फुले कोणती वेचुनी माळा गुंफू तुजला प्रभु
फुलांतील गंध तूच की विभु
सदा तृप्त तुज नैवेद्या कायसे
तहान भूक तुज म्हणोनी होय पिसे ॥८॥

तांबूल समर्पण कवण मुखी करू कसे
प्रदक्षिणा तुज नमन करू मी कुठे करू ना कळे
जिथे तव रूप सर्व व्यापिले ॥९॥

वेदही जेथे वर्णन करण्या नेति नेति ने थके
काय मी स्तवू बापुडे मुके ॥१०॥

सूर्यप्रभा तुजपुढे कितीतरी उजळत नी फिकी असती
काय कापूर उजळू आरती ॥११॥

केवी विसर्जन करू कुठे मी जागा नच सापडे
पहावे तिथे तुझे रूपडे ॥१२॥

| JUNE '14 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |
| M | T | W | T | F | S | S |

करू मानसपूजन हाव मानसी मोडली
नी हावचि आता तव रूपा पावली
तू देव भक्त मी कल्पनाच नासली
होय प्रभू तव पूजा करितो दत्तात्रय ओतरी
उमजली तव पदभावित खरी ॥

© www.madhaveeraghuveer.com